# तंत्र शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रीयेचे नियम

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७

महाराष्ट्र शासनाने मागील वर्षी महाराष्ट्र अधिनियम क्र.२८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ) अधिनियम, २०१५ पारित केला असून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी व त्यावरील देखरेखीसाठी आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांची नेमणूक केलेली आहे. वरील अधिनियमाच्या अनुषंगाने राज्य शासनाने प्रवेश प्रक्रियेचे नियम तयार करून प्रसिद्ध करणे अपेक्षित होते व त्यानुसार तंत्र शिक्षण विभागाने सर्व प्रवेश साठीचे पात्रता निकष व प्रवेश प्रक्रिया पद्धती या बाबत राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. प्रवेश प्रक्रियेचे नियम तयार करत असतांना प्रवेश पारदर्शी पद्धतीने, गुणवत्तेच्या आधारे व केंद्रीभूत पद्धतीने करण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

१) सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा अनिवार्य करण्यात आलेली आहे. प्रवेश परीक्षा हि राज्य सामायिक प्रवेश परीक्षा असेल किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतीही राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा असेल. (उदा. वास्तुशास्त्र पदवी प्रवेशासाठी नाटा[NATA] हि प्रवेश परीक्षा असेल). तथापि दहावी व बारावी नंतरचे पदविका अभ्यासक्रमास, थेट द्वितीय वर्ष पदविका व पदवी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र अभ्यासक्रम आणि थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे.

२) संस्था स्तरावरील प्रवेशाव्यतिरिक्त सर्व प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून आयुक्त यांचे देखरेखीखाली करण्यात येतील.

३) केंद्रीभूत प्रवेश व संस्थास्तारावरील प्रवेश हे फक्त केंद्रीभूत प्रवेशासाठी तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रमांकाच्या आधारे करण्यात येतील.

४) अनिवासी भारतीय विद्यार्थी, विदेशी विद्यार्थी, ओ.सी.आय., ई. यांची गुणवत्ता यादी हि सक्षम प्राधिकरणाद्वारे प्रसिद्ध करण्यात येईल व ज्या संस्थाना अशा प्रकारचे प्रवेश करण्याची राज्य शासन व समुचित प्राधिकरणाची मान्यता असेल अशा संस्थेमध्ये प्रवेशासाठी आवेदनपत्र सदर करतील व सक्षम प्राधिकरणाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रमानुसार त्यांचे प्रवेश संस्था स्तरावर करण्यात येतील.

५) या प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दोन प्रकारचे केंद्र असतील.

सुविधा केंद्र - या ठिकाणी आवेदनपत्रा संबंधातील सामुग्रीची विक्री, संगणकीय पध्दतीने कागदपत्रांची ,अर्ज भरणे (ऑनलाईन)तपासणी/छाननी करणे व तक्रारींचे निवारण करणे यासारख्या सेवा पुरविल्या जातील

"प्रवेश उपस्थिती केंद्र"- जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करुन आणि आवश्यक शुल्काचा भरणा करुन प्रवेश निश्चित करण्यासाठी हजर राहतील.

## केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्पे

१. सक्षम प्राधिकरणाद्वारे प्रवेश प्रक्रियेची माहिती पुस्तिका प्रकाशित करणे.

२. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी आवेदनपत्र सदर करणे.

३. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी सादर केलेल्या माहितीची व आवश्यक कागदपत्रांची सुविधा केंद्रावर जाऊन पुष्टी करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे कागदपत्रांची तपासणी केलेल्या उमेदवारांचीच नावे तात्पुरती गुणवत्ता यादीमध्ये प्रसिद्ध करण्यात येतील.

४. सक्षम प्राधिकरणाद्वारे तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे त्यावरील हरकती किंवा तक्रारी नुसार आवश्यक त्या दुरुस्त्यासह अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे.

५. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी उपलब्ध जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.

६. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने केंद्रीभूत प्रवेशासाठी विकल्प अर्ज सादर करणे. विकल्प अर्जामध्ये उतरत्या पसंतीक्रमाने पाहिजे असलेल्या अभ्यासक्रमांची यादी सदर करणे. विकल्प अर्जामधील एक क्रमांकाचा विकल्प म्हणजेच उमेदवारास पाहिजे असलेला सर्वोत्तम विकल्प समाजाला जाईल, तो विकल्प गुणवत्तेनुसार मिळत नसेल तर त्यानंतरच्या विकाल्पासाठी क्रमाने विचार करण्यात येईल. पहिल्या फेरीपूर्वी सदर करण्यात आलेला विकल्प अर्ज हा तीनही फेऱ्यांसाठी साठी वापरण्यात येईल. पहिल्या फेरीनंतर जर एखाद्या उमेदवाराने वाटप केलेल्या जागेवर प्रवेश निश्चित केला नाही किंवा प्रवेश घेऊन रद्द केला तर अश्या रिक्त जागेचे वाटप गुणवत्तेनुसार त्या पुढील फेरीमध्ये करण्यात येईल.

७. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील जागांचे वाटप संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. हि माहिती उमेदवारांना त्यांच्या लॉगइन मधून सुद्धा उपलब्ध असेल.

८. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील जागांचे वाटपानुसार उपस्थिती केंद्रावर उमेदवाराने ती जागा स्वीकारणे. उमेदवारास जागा वाटप झाल्यानंतर उपस्थिती केंद्रावर जाऊन जागा स्वीकारणे आवश्यक आहे अन्यथा ती जागा त्याने नाकारली आहे असा त्याचा अर्थ होतो व त्यानंतर तो दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी अपात्र होतो. एखाद्या उमेदवारास मिळालेल्या विकाल्पापेक्षा चांगला विकल्प पाहिजे असेल तरी सुद्धा त्याने मिळालेली जागा स्वीकारणे आवश्यक आहे. चांगला विकल्प मिळाल्यानंतर पूर्वी देण्यात आलेली जागा आपोआप रद्द करण्यात येते.

९. प्रवेश स्वीकारतेवेळी उमेदवारास फ्रीझ, स्लाइड किवा फ्लोट यापैकी एक पर्याय निवडणे आवश्यक आहे.

अ) फ्रीझ चा अर्थ उमेदवारास वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यायचा असून त्यापेक्षा चांगल्या पर्यायाची तो अपेक्षा ठेवत नाही. अशा प्रकारातील विद्यार्थी दुसऱ्या व तिसऱ्या फेरीस पात्र असणार नाहीत.

आ) स्लाइड चा अर्थ उमेदवारास वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यायचा असून फक्त त्याच संस्थेमध्ये त्यापेक्षा चांगल्या विकल्पाची जागा मिळाल्यास तो घेणार आहे, असे विद्यार्थी दुसऱ्या व तिसऱ्या फेरीस पात्र असतील.

इ) फ्लोट चा अर्थ उमेदवारास वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यायचा असून त्यपेक्षा चांगल्या विकल्पाची जागा मिळाल्यास तो घेणार आहे, असे विद्यार्थी दुसऱ्या व तिसऱ्या फेरीस पात्र असतील

१०. विद्यार्थ्यास चांगल्या विकल्पाची जागा मिळाल्यास त्याला त्यापूर्वीच्या फेरीमध्ये वाटप करण्यात आलेली जागा काढून घेण्यात येईल व ती इतर पात्र उमेदवारास गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

११. ज्या उमेदवारास पहिला विकल्प मिळालेल्या आहे त्याला फ्लोट किंवा स्लाइड असा पर्याय निवडता येणार नाही. कारण त्याला त्याचा सर्वोत्कृष्ट विकल्प मिळालेला आहे परंतु त्यास तो बदलावयाचा असल्यास तशी संधी चौथ्या फेरीपूर्वी घेण्यात येणाऱ्या विकल्प अर्जामध्ये असेल, यावेळी त्याला विकल्प यादी, त्यातील अभ्यासक्रम, विकल्पाची क्रमवारी बदलता येईल.

१२. चौथ्या फेरीमध्ये उपलब्ध असलेल्या जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.उमेदवारांना त्यांनी भरलेला विकल्प अर्ज बदलता येईल किंवा नवीन अर्ज भारता येईल.

अ) या फेरीपूर्वी उमेदवारास त्याने यापूर्वी दिलेला फ्रीझ, फ्लोट, स्लाइड हा पर्याय बदलता येईल.

आ) ज्या उमेदवारांना या फेरीपूर्वी जागा वाटप झालेले नसेल किंवा ज्यांनी प्रवेश मिळाला असेल व नंतर तो रद्द केलेला असेल असे सर्व उमेदवार या फेरीसाठी पत्र असतील.

इ) या फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यावर त्यास पूर्वी वाटप करण्यात आलेली जागा काढून घेण्यात येईल व त्यावर त्याचा हक्क असणार नाही.

ई) हि शेवटची फेरी असल्याने या फेरीमध्ये फ्लोट, स्लाइड हा पर्याय उपलब्ध असणार नाही.

उ) चौथ्या फेरीनंतर वाटप करण्यात आलेल्या जागेवर उपस्थिती केंद्रावर जाऊन प्रवेश स्वीकारणे.

१३. चौथ्या प्रवेश फेरीमधील जागा वाटपा नंतर प्रत्यक्ष संस्थेमध्ये जाऊन प्रवेशाची पुष्टी करणे. या वेळी उमेदवार त्याला वाटप करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेशासाठी आवश्यक शुल्क (रु. ५,०००/- वजा करून, पदविका

अभ्यासक्रमासाठी रु. ३,०००/- वजा करून ) भरून व आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रवेश निश्तित करून प्रक्रिया पूर्ण करेल.

१४. केंद्रीभूत प्रवेशाच्या सर्व फेऱ्या झाल्यानंतर संस्था स्तरावर प्रवेश करण्यात येतील. या प्रक्रियेसाठी गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार पात्र असतील. याबाबत आवश्यक सूचना नियमांमध्ये दिलील्या आहेत.

## प्रक्रियेची वैशिष्टे

१. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी आवेदनपत्र सदर करणे अनिवार्य असून सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या गुणवत्ता क्रमांकानुसारच सर्व प्रवेश, संस्थास्तारासाहित, करण्यात येतील.

२. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने सर्व प्रक्रिया करावयाच्या असल्याने प्रणालीद्वारे देण्यात आलेला संकेतांक (Application ID) व पासवर्ड काळजीपूर्वक सांभाळायचा आहे. तसेच पासवर्ड कोणालाही सांगायला नको. तसेच अर्जात इमेल व मोबाईल क्रमांक अचूक भरावा जेणेकरून सक्षम प्राधिकारी यांचेकडून वेळोवेळी मिळणारे संदेश प्राप्त होतील.

३. पात्रता परीक्षेत गुणांमध्ये बदल झाल्यास उमेदवार जर पत्र होत असेल तर अश्या विद्यार्थ्याच्या गुणांमध्ये आवश्यक बदल करून गुणवत्ता क्रमांक देऊन पुढील फेरीसाठी पत्र करण्यात येईल. परंतु याकरिता उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज केलेला असावा.

४. पहिल्या तीन फेऱ्यांसाठी एकच विकल्प अर्ज घेण्यात येईल, त्यामुळे तीन वेळा वेगळा अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्याचा वेळ व श्रम कमी होतील. याकरिता उमेदवाराने काळजीपूर्वक व अभ्यासपूर्वक सर्व विकल्प अर्ज भरावयाचा आहे. कोणत्याही परीस्थितीत पासवर्ड दुसऱ्या कोणालाही देऊ नये जेणेकरून त्याचा दुरुपयोग होणार नाही तसेच त्याची गुप्तपणे नोंद ठेवावी.

५. उमेदवारास पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये एकही ठिकाणी प्रवेश नाही मिळाल्यास त्यास तो विकल्प अर्ज बदलण्याची संधी चौथ्या फेरीपूर्वी देण्यात येईल. चुकीचे विकल्प भरणे , चुकीने फ्रीझ करणे किंवा विचार बदलाने यासाठी त्यास अर्ज बदलासाठी एक संधी असेल.चुकीचे किंवा कमी विकल्प भरल्यामुळे त्याचे वर्ष वाया जाणार नाही.

६. अल्पसंख्यांक संस्थाना त्यांच्या न भरलेल्या जागा भरण्यासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीपूर्वी समर्पित करता येतील. अल्पसंख्यांक समुदायाच्या उमेदवारांसाठीच्या जागा त्यांना शेवटच्या फेरीतील शेवटच्या टप्प्यापर्यंत देण्याचा प्रयत्न केला जाईल व त्यानंतर त्या वर्गवारीचा उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या सर्वसाधारण गटातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार देण्यात येतील.

७. राखीव जागा भरण्यासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीमध्ये पात्र उमेदवारांना जागांचे वाटप करण्यात येईल. शेवटच्या फेरीतील शेवटच्या टप्प्यापर्यंत राखीव जागा त्या संवर्गातील उमेदवारांना देण्याचा प्रयत्न केला जाईल व

त्यानंतर त्या गटासाठीचा उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या सर्वसाधारण गटातील उमेदवारांना देण्यात येतील.

८. उमेदवारांना अधिक चांगल्या जागेचा पर्याय (Betterment) देण्यात येणार असल्याने त्याला/तिला मिळालेल्या जागेवरील प्रवेश अबाधित ठेऊन पुढील फेरीमध्ये प्रवेशासाठी प्रयत्न करता येणार आहे. त्याला पूर्वीपेक्षा चांगल्या जागेवर प्रवेश मिळाल्यानंतरच त्याचा पूर्वी मिळालेला प्रवेश रद्द आपोआप करण्यात येणार आहे. यामुळे त्याला चांगल्या संस्थेची/ अभ्यासक्रमाची वाट पाहणे यामध्ये कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्याची भीती नाही व गुणवत्तेनुसार त्याला त्याच्या विकल्पानुसार जास्तीत जास्त चांगला विकल्प उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

९. ज्या विध्यार्थ्यांना प्रवेशासाठी जागेचे वाटप करण्यात येईल त्यांनी वाटप करण्यात आलेली जागा स्वीकारण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर जाने आवश्यक असून प्रवेश निश्चितीसाठी त्यांना रु.५,०००/- (रु. ३,०००/- पदविका अभ्यासक्रमासाठी) किंवा रु. १,०००/- (अनुसूचित जाती / जमातीचा असल्यास) धनादेशाद्वारे द्यावे लागणार आहेत. हि रक्कम त्यांना प्रवेश रद्द केल्यास प्रक्रिया शुल्क वजा करून तात्काळ परत करण्यात येईल. परंतु त्यांना जर प्रवेश कायम करायचा असेल तर हि रक्कम त्यांना ज्या संस्थेमध्ये प्रवेश मिळाला आहे त्या संस्थेकडे प्रक्रिया शुल्क रु.१,०००/- वजा करून पाठविण्यात येईल.

१०. प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये जाण्याची आवश्यकता नाही. प्रवेश प्रवेश निश्चिती केंद्रावर प्रवेश रद्द करता येईल व त्यांने भरलेली रक्कम सुद्धा तेथूनच प्रक्रिया शुल्क वजा करून तात्काळ परत करण्यात येईल. यामुळे प्रवेश रद्द करतेवेळी विद्यार्थ्यांना होणारा त्रास व वेळेचा होणारा अपव्यय टाळता येणार आहे. उमेदवारांना पूर्ण फीभरणेबाबत संस्था दबाव आणत असल्याबाबतच्या तक्रारी येत असतात. बऱ्याच वेळा त्यांची कागदपत्रे परत दिली जात नाहीत व पर्यायाने विद्यार्थ्याचे इतर ठिकाणचे प्रवेश रद्द होण्याची शक्यता असते. हे सर्व प्रकार यामुळे टाळता येणार आहेत.

११. संस्था स्तरावरील प्रवेश करतांना सुद्धा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील गुणवत्ता क्रमांक विचारात घेण्यात येणार आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील कायद्यांतर्गत समावेश असलेल्या सर्व संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी राजपत्रात अधिसूचित केल्याप्रमाणे सर्व उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी सादर केलेल्या माहितीची व आवश्यक कागदपत्रांची सुविधा केंद्रावर जाऊन पुष्टी करणे आवश्यक आहे

१२. अशा प्रकारे या प्रक्रियेची नियमावली तयार करण्यात आलेली असून यामध्ये गुणवत्तेच्या आधारे पारदर्शी पद्धतीने व केंद्रीभूत पद्धतीने प्रवेश करण्यात येणार आहेत.

१३. शासकीय, अनुदानित व विनानुदानित संस्थांचे प्रवेश आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत एक खिडकी पद्धतीने केंद्रीभूत प्रवेश परीक्षेद्वारे करण्यात येतील.

१४. अधिक माहितीसाठी वरील सर्व अधिसूचना तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारासाठी अभ्यासक्रम आणि त्यासाठी घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा किंवा इतर परीक्षा जी प्रवेश परीक्षा समजण्यात येईल.

| | |
|---|---|
| पदविका अभ्यासक्रम प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेश | प्रवेश परीक्षेमधून सूट |
| पदवी अभ्यासक्रम | |
| अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |
| वास्तुशास्त्र | वास्तुशास्त्र परिषदेद्वारे (COA) घेण्यात येणारी नाटा परीक्षा हि प्रवेश परीक्षा असेल |
| थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी,<br>थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र | प्रवेश परीक्षेमधून सूट |
| पदव्युत्तर पदवी प्रवेश | |
| एम बी ए / एम एम एस | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा, |
| एम सी ए | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |
| अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | भारतीय प्रोद्योगिकी संस्थे (IIT) द्वारा घेण्यात येणारी GATE परीक्षा |
| औषधनिर्माणशास्त्र | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदे (AICTE) द्वारे घेण्यात येणारी PAT परीक्षा |
| वास्तुशास्त्र | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |
| हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान अभ्यासक्रम | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |

अद्ययावत माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर तसेच मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी बघावी.

www.dtemaharashtra.gov.in

www.mahacet.org

www.maharashtra.gov.in

htedu.maharashtra.gov.in

डॉ. सुभाष महाजन
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय , मुंबई